www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**B**

# Paper-III
# PSYCHOLOGY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

(Name) ..................................................

2. (Signature) ..........................................

(Name) ..................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## APR - 13317

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **40** Number of Questions in this Booklet : **75**

### Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

### विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 75 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गाचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

www.prepp.in

www.prepp.in

APR - 13317/III—B

# PSYCHOLOGY
## Paper III
# मानसशास्त्र
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This Question Paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions. Each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Projective techniques typically involve :
   (A) A set of ink blots
   (B) An ambiguous set of stimuli
   (C) True-false statement
   (D) Set of non-sense syllables

2. Guilford's model of the structure of intellect :
   (A) would fall under the biological metaphor category
   (B) is a theoretical model with no practical tests
   (C) postulates multiple intelligence
   (D) postulates processes, contents and products

1. प्रक्षेपण तंत्रात विशेषत: याचा समावेश होतो :
   (A) शाईच्या डागांचा संच
   (B) संदिग्ध उद्दीपकांचा संच
   (C) खरी-खोटी विधाने
   (D) अक्षरांचा अर्थहीन समूह

2. बुद्धीच्या रचनेचे गिलफोर्डचे प्रारूप :
   (A) जैविक रूपकाच्या श्रेणीत पडेल
   (B) व्यावहारिक चाचणी नसण्यासह सैद्धांतिक प्रारूप आहे.
   (C) बहुविध बुद्धिमत्ता गृहीत धरणे
   (D) प्रक्रिया, आशय आणि उत्पादन गृहीत धरणे

www.prepp.in



3. The thematic apperception test (TAT) is used to study :

(A) Conscious experience

(B) Unconscious motives

(C) Motivational energy

(D) Child-rearing practices

3. चित्र अवबोध चाचणी अभ्यासासाठी वापरली जाते :

(A) बोध (जाणीव पातळीवरील) अनुभव

(B) अबोध प्रेरणा

(C) प्रेरणात्मक उर्जा

(D) बालसंगोपन रीती

4. Torrance tests of creative thinking (TTCT) are mainly indexing :

(A) Creative products

(B) Creative proceses

(C) Creative personality

(D) Creative persuation

4. टोरान्सची सृजनशील विचार चाचणी (TTCT) प्रामुख्याने निर्देशांक आहे :

(A) सृजनशील सर्जन

(B) सृजनशील प्रक्रिया

(C) सृजनशील व्यक्तिमत्त्व

(D) सृजनशील अनुकूलता

www.prepp.in



5. Match List I with List II and select the *correct* answer using the codes given below :

**List I**

(P) Algorithms

(Q) Heuristics

(R) Means-End Analysis

(S) Backward search

**List II**

(1) Problem is divided into a number of sub-problems.

(2) Starts with goal state to original state.

(3) Acts as a shortcut method

(4) Leads to mechanical solution

**Codes :**

| | (P) | (Q) | (R) | (S) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (3) | (1) | (2) |
| (B) | (1) | (2) | (3) | (4) |
| (C) | (2) | (1) | (4) | (3) |
| (D) | (3) | (4) | (2) | (1) |

5. यादी I आणि यादी II शी जोडा आणि खाली दिलेल्या सांकेतांकाच्या आधारे योग्य उत्तर निवडा :

**यादी I**

(P) अल्गोरिद्म

(Q) नवनामी

(R) साध्य-साधन विश्लेषण

(S) अप्रगत शोध

**यादी II**

(1) समस्या ही अनेकविध उपसमस्यांमध्ये विभागली जाते.

(2) ध्येयस्थितीपासून सुरुवात ते मूळस्थितीपर्यंत

(3) शॉर्टकट पद्धतीने कृती

(4) यांत्रिकी उत्तर शोधण्यासाठी पुढाकार

**सांकेतांक :**

| | (P) | (Q) | (R) | (S) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (3) | (1) | (2) |
| (B) | (1) | (2) | (3) | (4) |
| (C) | (2) | (1) | (4) | (3) |
| (D) | (3) | (4) | (2) | (1) |

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



6. A schedule of reinforcement in which the number of responses required to produce a reinforcement changes unpredictably during the experiment is referred to as :

(A) Mixed schedule

(B) Variable-ratio schedule

(C) Variable-internal schedule

(D) Multiple schedule

7. The first step in a behaviour modification programme is to :

(A) Pick an appropriate reinforcement

(B) Specify a target behaviour

(C) Design the programme

(D) Gather baseline data

6. अशी प्रबलन सारणी की ज्यात प्रयोग कालावधीमध्ये अनपेक्षितरित्या प्रबलीकरण बदल निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या प्रयत्नांची आवश्यकता असते, त्यास असे संबोधले जाते :

(A) संमिश्र सारणी

(B) परिवर्तनीय-गुणोत्तर सारणी

(C) परिवर्तनीय-मध्यंतर सारणी

(D) बहुविध सारणी

7. वर्तन परिवर्तन कार्यक्रमातील पहिली पायरी आहे तीत :

(A) योग्य प्रबलीकरणाची निवड करा

(B) लक्षीत वर्तन अधोरेखीत करा

(C) कार्यक्रमाची आखणी करा

(D) पायाभूत प्रदत्त गोळा करा

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



8. The minimum intensity of a stimulus that a subject can perceive 50% of the time is the :

(A) Minimum threshold

(B) JND

(C) Absolute threshold

(D) Difference threshold

9. Which of the following could be the *correct* order of steps involved in training programme ?

(1) Determining level of training

(2) Identifying principles of learning

(3) Knowing about the trainees

(4) Determining methods and techniques

(5) Who would be the trainers

(A) (3), (5), (4), (1), (2)

(B) (4), (1), (3), (2), (5)

(C) (3), (5), (1), (4), (2)

(D) (3), (4), (1), (5), (2)

8. प्रयुक्ताला 50% वेळा जाणवणारी उद्दीपकाची कमीतकमी तीव्रता :

(A) लघुत्तम सीमा

(B) जे. एन्. डी.

(C) निरपेक्ष सीमा

(D) भेद सीमा

9. प्रशिक्षण उपक्रमांमध्ये खालील बाबींचा बरोबर क्रम कोणता ते ओळखा :

(1) प्रशिक्षणाची पातळी ठरविणे.

(2) अध्ययनतत्त्व ठरविणे/ओळखणे

(3) प्रशिक्षणार्थी कोण आहेत हे समजून घेणे.

(4) तंत्र आणि पद्धत ठरविणे

(5) प्रशिक्षक कोण असतील हे ठरविणे.

(A) (3), (5), (4), (1), (2)

(B) (4), (1), (3), (2), (5)

(C) (3), (5), (1), (4), (2)

(D) (3), (4), (1), (5), (2)

www.prepp.in



10. Counselling centres in schools require :

(1) Career testing and counselling

(2) Play therapy

(3) Subject coaching and tuitions

(4) Emotional counselling

(A) (1) and (2) only

(B) (1), (2) and (3) only

(C) (1), (3) and (4) only

(D) (1), (2) and (4) only

11. Which of the following is *not* the stage of moral development according to Kohlberg ?

(A) Pre-moral

(B) Self-accepted

(C) Conventional

(D) Post-super-ego

10. शाळेतील समुपदेशन केंद्रात ह्यांची गरज असते :

(1) व्यवसाय चाचणी व मार्गदर्शन

(2) खेळ उपचार

(3) विषयाचे शिक्षण व शिकवणी

(4) भावनिक समुपदेशन

(A) (1) व (2) फक्त

(B) (1), (2) व (3) फक्त

(C) (1), (3) व (4) फक्त

(D) (1), (2) व (4) फक्त

11. कोहलबर्गच्या मतानुसार खालीलपैकी कोणता नैतिक विकासातील टप्पा **नाही** ?

(A) नैतिक-पूर्व

(B) स्व-स्वीकृत

(C) परंपरागत

(D) परा-अहम् पश्चात

www.prepp.in



12. Whether people think of themselves as males or females reflects their :

(A) Gender

(B) Gender role

(C) Gender schema

(D) Gender identity

13. Who argued that language must be governed by universal grammar ?

(1) Noam Chomsky

(2) Roger Brown

(3) Lev Vygotsky

(4) Freud

**Codes :**

(A) (1) only

(B) (4) only

(C) (1) and (2)

(D) (3) and (4)

12. लोक स्वत:विषयी विचार करताना आपण स्त्री किंवा पुरुष आहोत हे त्यांच्याकडून परावर्तीत होते :

(A) लिंग

(B) लिंग भूमिका

(C) लिंग आकृतिबंध

(D) लिंग ओळख.

13. भाषा ही वैश्विक व्याकरणाधारेच चालावी/ नियमित व्हावी असे कोणाचे मत आहे ?

(1) नोम चोम्स्की

(2) रॉजर ब्राऊन

(3) लेव्ह वागोटस्की

(4) फ्रॉईड.

**सांकेतांक :**

(A) फक्त (1)

(B) फक्त (4)

(C) (1) आणि (2)

(D) (3) आणि (4)

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**Question Nos. 14 to 17 :**

In the following questions, each question has two statements – Assertion (A) and Reason (R). Read each question carefully and decide whether Assertion and Reason are individually correct or not, and if they are correct, whether the Reason is a valid explanation of the Assertion. For each question, before the corresponding question number, indicate your answer using the following codes :

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A).

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation.

(C) (A) is true but (R) is false.

(D) (A) is false but (R) is true.

**प्रश्न क्र. 14 ते 17 :**

खालील प्रश्नांमध्ये, प्रत्येक प्रश्नात दोन वाक्ये आहेत—एक विधान (Assertion or A) व कारण (Reason or R) प्रत्येक प्रश्न काळजीपूर्वक वाचा. विधान आणि कारण स्वतंत्रपणे बरोबर आहेत की नाही ते ठरवा, आणि ती बरोबर असतील तर कारण हे विधानाचे यथार्थ स्पष्टीकरण आहे का ते ठरवा. प्रत्येक प्रश्नासाठी त्याच्या योग्य प्रश्नक्रमांकासमोर खालील सांकेतांक वापरून आपले उत्तर दर्शवा :

(A) विधान (A) व कारण (R) दोन्ही सत्य आहेत व कारण (R) हे विधानाचे योग्य स्पष्टीकरण आहे.

(B) विधान (A) व कारण (R) दोन्ही सत्य आहेत पण कारण (R) हे बरोबर स्पष्टीकरण नाही.

(C) विधान (A) सत्य आहे पण कारण (R) हे चूक आहे.

(D) विधान (A) चूक आहे पण कारण (R) हे सत्य आहे.

www.prepp.in



14. **Assertion (A) :** Wernicke's area is the seat of speech comprehension.

**Reason (R) :** All Aphasics have suffered Wernicke's area damage.

15. **Assertion (A) :** Nissl staining is a preferred method over Golgi staining of neural tissue.

**Reason (R) :** Nissl selectively stains cell bodies, Golgi permits neural view in silhouette

14. **विधान (A) :** भाषा समाकलन वेर्निके क्षेत्रात पार पडते.

**कारण (R) :** भाषा अक्षमता असलेल्या सर्व व्यक्तींना वेर्निके क्षेत्रात छेद आढळतो.

15. **विधान (A) :** निसल डाग पद्धती ही चेता उतीच्या गोल्गाय डागांपेक्षा वरचढ पद्धत मानली जाते

**कारण (R) :** निसल पद्धती चेतापेशींना निवडक डागाळते, तर गोल्गाय पद्धती पेशींची आकृती दर्शवते

www.prepp.in



16. **Assertion (A) :** Rohan remembers that when he was 4 years old, his grandfather gave him a toy-horse which he valued most.

**Reason (R) :** Theory of memory development states that situations become important factors in child's memory from 3 to 6 years of age.

17. **Assertion (A) :** Joint story book reading impacts children's literacy outcomes.

**Reason (R) :** Parents' interactions with children around the text leads to learning and relationship benefits.

16. **विधान (A) :** रोहनला हे आढवते की तो चार वर्षांचा असतांना त्याच्या आजोबांनी त्याला खेळण्यातील घोडा भेट दिला, तो त्याला खूप मूल्यवान वाटतो.

**कारण (R) :** स्मृती विकासाचा सिद्धांत असे सांगतो की तीन ते सहा वर्षे वयाच्या मुलांच्या स्मृतीमध्ये प्रसंग हे महत्त्वाचे घटक असतात.

17. **विधान (A) :** गोष्टींच्या पुस्तकांचे एकत्रित वाचनाने मुलांची सक्षारता सुधारते.

**कारण (R) :** मातापित्यांची मुलांबरोबरची पुस्तकासभोवतालची अंतर्क्रिया अध्ययन व नातेसंबंध, दोहोला पोषक ठरते.

www.prepp.in



18. In considering ethical issues, three areas are most important :

(A) Qualification of the examiner, privacy and feedback

(B) Informed consent, confidentiality and privacy

(C) Feedback, rapport and informed consent

(D) Validity, reliabiliy and norms

19. Temperature as measured by the Fahrenheit scale is a good example of a(n) .................................. scale.

(A) ratio

(B) interval

(C) ordinal

(D) nominal

18. चाचण्यांच्या संबंधी नैतिक बाबींचा विचार करता या तीन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात :

(A) परीक्षकाची शैक्षणिक पात्रता, गोपनीयता आणि प्रतिभरण

(B) माहितीपूर्ण संमती, गोपनीयता, खासगीपणा

(C) प्रतिभरण, संवादसाधने आणि माहितीपूर्ण संमती

(D) यथार्थता, विश्वसनीयता आणि मानदंड

19. फॅरेनाईट मापनीमध्ये तापमानाचे मापन करणे हे याचे एक चांगले उदाहरण आहे :

(A) गुणोत्तर मापनी

(B) समअंतर मापनी

(C) पदानुक्रम मापनी

(D) नाममात्र मापनी

www.prepp.in

prepp Your Personal Exams Guide



20. Carl Rogers believes that we are all innately guided toward :

(A) Fulfilment

(B) Positive growth and change

(C) Superiority

(D) Both fulfilment and positive growth and change

21. Intelligence tests are to as creativity tests are to :

(A) divergent thinking; convergent thinking

(B) internal locus of control; external locus of control

(C) convergent thinking; divergent thinking

(D) factorial validity; tertiary validity

22. Internal and external factors that direct an organism's behaviour towards a desired outcome is referred as :

(A) Emotion

(B) Homeostasis

(C) Motivation

(D) Arousal

20. कार्ल रॉजर्सचे असे मानने आहे की, आपण सर्व उपजतपणे तिकडे वळतो :

(A) समाधान करण्यासाठी

(B) सकारात्मक वाढ व बदल घडण्यासाठी

(C) श्रेष्ठत्व मिळविण्यासाठी

(D) समाधान मिळविण्यासाठी आणि सकारात्मक वाढ व बदल घडविणे हे दोन्हीही.

21. बुद्धिमता चाचण्या आहेत म्हणून सृजनशील चाचण्या आहेत :

(A) बहुलक्षी विचार; संलक्षी विचार

(B) अंतर्गत स्थानीय नियंत्रण; बाह्य स्थानीय नियंत्रण

(C) संलक्षी विचार; बहुलक्षी विचार

(D) घटकात्मक यथार्थता; टरटीयरी यथार्थता

22. अंतर्गत आणि बाह्य घटक जे इच्छित फलनिष्पत्तीसाठी जीवाच्या वर्तनाला दिशा देतात त्यास असे संबोधले जाते :

(A) भावना

(B) अंत:स्थितिस्थिरण

(C) प्रेरणा

(D) उत्तेजना



prepp Your Personal Exams Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



23. The tendency of people to remember factual information by routinely organizing the information into categories is referred to as :

(A) Chinking

(B) Spreading activation

(C) Source monitoring

(D) Clustering

24. Research by Loftus on eyewitness testimony indicates that what people recall of an accident or crime scene :

(A) can be influenced by the type of questions they are asked

(B) can be significantly improved by the use of hypnosis

(C) is distorted by emotion and is completely inaccurate

(D) is so vivid that it is subject to very little memory error

23. नियमितपणे माहितीचे संघटन वर्गीकरणात करून वस्तुस्थिती निदर्शक माहिती आठवणे असा लोकाचा कल असतो त्यास असे संबोधले जाते :

(A) चंकींग

(B) सक्रिय विस्तार

(C) स्रोताचे नियमन

(D) पुंजका

24. लोफ्टसने प्रत्यक्षदर्शी साक्षी पुराव्यावरील संशोधनाद्वारे असे, दर्शविते की एखाद्या अपघाताचे अथवा गुन्ह्यांच्या प्रसंगाचे प्रत्यावहन लोक काय करतात ?

(A) त्यांना कोणत्या प्रकारचे प्रश्न विचारले जातात यांचा प्रभाव त्यांच्यावर पडू शकतो

(B) संमोहनाधारे त्याच्यामध्ये लक्षणीय सुधारणा दिसू शकतात

(C) भावनामुळे विघाड आणि पूर्णता चूक होते

(D) अत्यंत स्पष्टशिवाय किंचित प्रमाणात स्मृतिचुका होतात

www.prepp.in



25. Which of the following is consistent with Gibson's ecological approach to perception ?

(A) The way we apprehend information directly from the environment helps guide our actions in the world.

(B) Information comes from senses helps to create an internal representation of the environment.

(C) The way we actively organize information into wholes helps us create an internal representation of the environment.

(D) Past experiences and prior knowledge help to create an internal representation of the environment.

25. खालीलपैकी कोणता घटक गिब्सनचा परिस्थितीजन्य दृष्टिकोन संवेदनाशी सूसंगत आहे ?

(A) वातावरणातून मिळणाऱ्या प्रत्यक्ष माहितीचे आकलन आपण ज्या पद्धतीने करतो त्याचा मार्गदर्शक म्हणून उपयोग जगात आपल्या कृती करताना होतो.

(B) वेदनेंद्रियाद्वारा मिळालेल्या माहितीचा मदत परिस्थितीचे अंतर्गत प्रतिरूपण करण्यासाठी होतो.

(C) माहितीचे सक्रिय संघटन संपूर्णरूपात केल्याने त्याची मदत परिस्थितीचे अंतर्गत प्रतिरूपण करण्यासाठी होतो

(D) परिस्थितीचे अंतर्गत प्रतिरूपण निर्मितीसाठी पूर्व अनुभव आणि गत अनुभवाची मदत होते.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



26. The following are cluster B personality disorders :

(1) Schizotypal

(2) Borderline

(3) Antisocial

(4) Narcissistic

(A) (1), (2) and (3) only

(B) (2), (3) and (4) only

(C) (1), (3) and (4) only

(D) (1), (2), (3) and (4)

27. A person who is extroverted, working under time pressure and high on achievement is most likely :

(A) High achiever in the organization

(B) Having type A personality

(C) Envied by his peer and subordinates

(D) Stressed with the jobs

26. खालील विकृती व्यक्तिमत्त्व विकृर्तीच्या 'ब' गटात मोडतात :

(1) स्किझोटायपल

(2) बॉर्डरलाइन

(3) एन्टीसोशल

(4) नार्सिसिस्टिक

(A) (1), (2) व (3) फक्त

(B) (2), (3) व (4) फक्त

(C) (1), (3) व (4) फक्त

(D) (1), (2), (3) व (4)

27. एखादी व्यक्ती जी बहिर्मुख आहे, वेळेच्या दबावाखाली काम करते, आणि उच्च संपादित आहे, तर ती बहुतांशी :

(A) संघटनेत उच्च संपादित असते

(B) टाईप-अे व्यक्तिमत्त्वाची असते

(C) सहकारी व कनिष्ठांच्या द्वेषाची धनी असते

(D) कामाच्या दबावाखाली असते

www.prepp.in



28. Which of the following are the principles of growth and development ?

(1) Uniformity of pattern

(2) Regression

(3) Imagination

(4) Integration

**Codes :**

(A) (1) and (2)

(B) (2) and (3)

(C) (3) and (4)

(D) (1) and (4)

29. According to Psychologist Diana Baumrind, which of the following parenting style has been found to be the best approach ?

(A) Democratic

(B) Authoritative

(C) Authoritarian

(D) Permissive

28. खालीलपैकी कोणती वाढ व विकासाची तत्त्वे आहेत ?

(1) संघातातील सारखेपणा

(2) प्रतीपगमन

(3) कल्पना

(4) एकत्रीकरण

**सांकेतांक :**

(A) (1) आणि (2)

(B) (2) आणि (3)

(C) (3) आणि (4)

(D) (1) आणि (4)

29. डायना बामरिंडच्यामते, खालीलपैकी कोणता पालकत्व शैलीचा उत्कृष्ट दृष्टीकोण म्हणून आढळून आलेला आहे ?

(A) लोकशाहीवादी

(B) अधिकारीवृत्ती

(C) हुकूमशाहीवादी

(D) उदार/मुक्त

www.prepp.in



30. When people are in good mood, they are :

(A) less likely to help

(B) more likely to help

(C) no more or less likely to help

(D) more likely to help but less likely to notice that others need help

31. To identify the extent to which the respondent presents a biased picture on a personality test, we can use :

(A) reliability scale

(B) factor analysis

(C) folk concepts

(D) validity scales

30. जेंव्हा लोक चांगल्या भावअस्थेत असतात तेव्हा ते :

(A) मदत करण्याची कमी शक्यता

(B) मदत करण्याची जास्त शक्यता

(C) मदत करण्याची शक्यता जास्तही नाही आणि कमीही नाही

(D) मदत करण्याची जास्त शक्यता परंतु इतरांना मदतीची आवश्यकता आहे हे लक्षात येण्याची कमी शक्यता

31. अनुक्रिया दात्याने व्यक्तिमत्तव चाचणीस प्रतिसाद देतांना किती प्रमाणात दुषीत (दिशाभूल) चित्र निर्माण केले आहे हे ओळखण्यासाठी आपण या मापन्या वापरतो :

(A) विश्वसनीयता मापनी

(B) घटक विश्लेषण

(C) लोक संकल्पना

(D) यथार्थता मापन्या

www.prepp.in

Your Personal Exams Guide



32. What is the only way to determine a causal relationship between two variables ?
    (A) Observation
    (B) Correlation
    (C) Measurement
    (D) Experimentation

33. The validity scales on the MMPI are represented by the following alphabets :
    (A) T, F, C
    (B) L, F, K
    (C) M, P, R
    (D) Y, N, C

34. Two-factor theory distinguishes a g-factor from s-factor. Who developed this theory ?
    (A) Gardner
    (B) Spearman
    (C) Weschler
    (D) Sternberg

32. दोन परिवर्तकांमधील कार्य-कारण संबंध ठरविण्यासाठी पुढीलपैकी कोणता मार्ग असू शकेल ?
    (A) निरीक्षण
    (B) सहसंबंध
    (C) मापन
    (D) प्रायोगिक

33. एम्. एम्. पी. आय्. मधील यथार्थता मापने खालीलपैकी कोणती अक्षरे दाखवितात ?
    (A) T, F, C
    (B) L, F, K
    (C) M, P, R
    (D) Y, N, C

34. द्वि-घटक सिद्धांत हा 'जी' घटक हा 'एस' घटकांपासून वेगळा आहे, हा सिद्धांत कोणी विकसित केला ?
    (A) गार्डनर
    (B) स्पीअरमन
    (C) वेश्लर
    (D) स्टर्नबर्ग

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



35. According to Yerkes-Dodson law, which level of arousal would lead to the best outcome in a difficult situation ?
    (A) A very low level
    (B) A moderately low level
    (C) A moderate level
    (D) A very high level

36. State the *correct* sequence of stages of problem solving :
    (A) Devising a plan-looking back-carrying out the plan-understanding the problem.
    (B) Understanding the problem-carrying out the plan-looking back-devising a plan.
    (C) Understanding the problem-devising a plan-carrying out the plan-looking back
    (D) Carrying out the plan-devising a plan-understanding the problem-looking back.

35. यर्कीस-डॉडसनच्या नियमानुसार, कठीणप्रसंगी चांगली निष्पत्ती मिळण्यासाठी चेतनेची/उत्तेजनाची कोणती पातळी पुढाकार घेते ?
    (A) अत्यंत कमी पातळी
    (B) मध्यम कमी पातळी
    (C) मध्यम पातळी
    (D) अत्यंत उच्च पातळी

36. समस्या परिहारातील पाय-यांचा अचूकक्रम सांगा :
    (A) नियोजन करणे-मागे वळून पाहणे-नियोजन अंमलात आणणे-समस्या समजून घेणे
    (B) समस्या समजून घेणे-नियोजन अंमलात आणणे-मागे वळून पाहणे-नियोजन करणे
    (C) समस्या समजून घेणे-नियोजन करणे-नियोजन अंमलात आणणे-मागे वळून पाहणे
    (D) नियोजन अंमलात आणणे-नियोजन करणे-समस्या समजून घेणे-मागे वळून पाहणे

www.prepp.in



37. If you attempt to improve your memory by focusing on attention, levels of processing, elaboration, and visual imagery, you are focusing on the memory process of :

(A) Memorization

(B) Storage

(C) Encoding

(D) Retrieval

38. The consolidation view of memory suggests that after the consolidation of long-term memory, the momory is stored in a region of the :

(A) Cerebral cortex

(B) Hippocampus

(C) Hypothalamus

(D) Cerebellum

37. जेव्हा तुम्ही तुमची स्मृती सुधारणा करण्याचा प्रत्यत्न करताना संस्करण पातळी, विस्तारीकरण, दृष्टिविषयक प्रतिमा आणि अवधानावर लक्ष केंद्रीत करता. तुम्ही स्मृती प्रक्रियेच्या यावर लक्ष केंद्रित करत आहात :

(A) स्मृतीकरण

(B) साठवण

(C) संकेतन

(D) प्रत्यानयन

38. स्मृतीचा एकत्रित दृष्टिकोन असा सूचवितो की, दीर्घकालीन स्मृतीच्या एकत्रीकरणानंतर स्मृती ही भागामध्ये साठवली जाते :

(A) प्रमस्तिष्क बाह्यक

(B) अश्वमीन

(C) अधश्चेताक्षेपक

(D) अनुमस्तिष्क

www.prepp.in



39. When noise presentation is responded to with a yes for signal presentation, it is called :

(A) hit

(B) correct rejection

(C) miss

(D) false alarm

40. A person with moderate mental retardation has IQ in the following range :

(A) 70 – 90

(B) 35 – 50

(C) 60 – 70

(D) 20 – 35

39. जेव्हा प्रयुक्त ध्वनी सादरीकरणाला संकेत उपस्थित आहे, त्याला असे म्हणतात :

(A) हिट

(B) अचूक अस्वीकार

(C) मिस

(D) मिथ्या सावधान

40. मॉडरेट अथवा नियामक मतिमंदत्व असलेल्या व्यक्तीचा बुद्ध्यांक इतका असतो :

(A) 70—90

(B) 35—50

(C) 60—70

(D) 20—35

www.prepp.in



41. The following are negative symptoms of schizophrenia :

(1) Auditory hallucinations

(2) Alogia

(3) Anhedonia

(4) Thought insertion

(A) (2) and (3) only

(B) (1) and (4) only

(C) (1), (2) and (3) only

(D) (2), (3) and (4) only

42. Which of the following is *not* a measure of performance appraisal ?

(A) 360 Degree feedback

(B) Quality circle

(C) Six sigma methodology

(D) Contingency management

41. खालील चिन्हे स्किझोफ्रेनियाची ऋणचिन्हे आहेत :

(1) श्रवण भास

(2) एलोगिया

(3) सुखदु:खाभाव

(4) विचार घालणे

(A) (2) व (3) फक्त

(B) (1) व (4) फक्त

(C) (1), (2) व (3) फक्त

(D) (2), (3) व (4) फक्त

42. खालीलपैकी कोणते कार्यमूल्यमापनाची पद्धत **नाही** ?

(A) 360 अंश प्रतिभरण

(B) क्वालिटी सर्कल (गुण समूह)

(C) सिक्स सिग्मा पद्धती

(D) अनुषंगिकता व्यवस्थापन

www.prepp.in



43. Dialogic teaching is characterized by :

(1) Collective orientation

(2) Reciprocal orientation

(3) Idealistic orientation

(4) Student centric orientation

**Codes :**

(A) (1) only

(B) (2) only

(C) (1) and (2)

(D) (3) and (4)

43. 'संवादवादी शिकविणे' हे याप्रमाणे अधोरेखित होते :

(1) सामूहिक आवड

(2) पारस्पारिक आवड

(3) आदर्शवादी आवड

(4) विद्यार्थी केंद्रित आवड

**सांकेतांक :**

(A) फक्त (1)

(B) फक्त (2)

(C) (1) आणि (2)

(D) (3) आणि (4)

44. According to Erikson, children ages 6 to 12 focus on efforts to meet the challenges presented by parents, peer and school. This stage is :

(A) Authority *Vs.* Shame and doubt

(B) Trust *Vs.* Mistrust

(C) Self *Vs.* Others

(D) Industry *Vs.* Inferiority

44. एरिक्सनच्या मतानुसार, पालक, मित्र आणि शाळेद्वारा दिलेल्या आव्हानांना सामोरे जाण्याच्या प्रयत्नांवर 6 ते 12 वर्षे वयाच्या मुलांचे लक्ष केंद्रित झालेले असते, त्या अवस्थेस हे म्हणतात :

(A) स्वायत्तता **विरुद्ध** लज्जा आणि शंका

(B) विश्वास **विरुद्ध** अविश्वास

(C) स्व **विरुद्ध** इतर

(D) उद्योगशिलता **विरुद्ध** न्यूनगंड

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



45. Orientation, open conflict and reconciliation best describe the three stages in :

    (A) Jury nullification

    (B) Eyewitness memory

    (C) Jury deliberation

    (D) Peremptory challenges

46. Factor analysis as a way of test construction assumes that :

    (A) scales within an instrument correlate highly with each other

    (B) all items that make up a scale do not correlate with each other

    (C) Cross validation is not necessary

    (D) Scales should be univariate and independent

45. उद्‌बोधन, खुलासंघर्ष आणि मिळवणी ह्या तीन पायऱ्या हे कशाचे चांगले वर्णन आहे ?

    (A) न्याय रद्द होणे

    (B) नेत्रसाक्षी स्मृती

    (C) न्यायी चर्चा

    (D) आव्हाने संपविणे

46. चाचणी निर्मितीचे एक साधन म्हणून घटक विश्लेषण तंत्र हे गृहीत धरते की :

    (A) चाचणीमधील मापन्या एकमेकांशी जास्त सहसंबंधित असतात.

    (B) ज्यांची मिळून चाचणी होते ती सर्व विधाने एकमेकांशी सहसंबंधित नसतात

    (C) पार-यथार्थीकरणाची आवश्यकता नसते

    (D) मापन्या एक परिवर्ती व स्वतंत्र असणे आवश्यक

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



47. Three groups of subjects were compared on the efficacy of different pharmacological treatments for hypertension. The most appropriate statistical analysis to determine the differences between mean scores of three groups would be :

(A) Regression analysis

(B) ANOVA (F-test)

(C) Correlation analysis

(D) *t*-test

48. Which of the following is *not* consistent with self-theories ?

(A) Optimistic view of human beings

(B) Here and now orientation

(C) Emphasis on drive towards growth and fulfilment

(D) A mechanistic view

47. अतिरक्तदाबावर वेगवेगळ्या औषधोपचारांची उपयोगिता तपासण्यासाठी प्रयुक्तांचे तीन गटांमध्ये तुलना करण्यात आली. तीन समूहातील मध्यमानातील भेद तपासण्यासाठी हे संख्याशास्त्रीय तंत्र वापरणे जास्त योग्य होईल :

(A) समाश्रयन विश्लेषण

(B) विचलन विश्लेषण (F-चाचणी)

(C) सहसंबंध विश्लेषण

(D) टी-चाचणी

48. खालीलपैकी कोणते स्व-सिद्धांतांशी सुसंगत **नाही** ?

(A) मानवाचा सकारात्मक दृष्टिकोन

(B) इथे आणि आता स्थितीमान

(C) विकास आणि समाधान या प्रेरणांवर भर

(D) यांत्रिकी दृष्टिकोन

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



49. Measurement of which type of thinking is one strategy to measure creativity ?

(A) Fluid

(B) Functional

(C) Divergent

(D) Savant

50. The one factor within the type A personality that seems to be most related to heart disease is :

(A) Hostility

(B) Impatience

(C) Thoughtfulness

(D) Defensiveness

49. सृजनशीलता मापनाचे धोरण ही एक कोणत्या विचारप्रक्रियेचा प्रकार मापन आहे ?

(A) द्रव पदार्थ

(B) कार्यात्मक

(C) बहुलक्षी (भिन्न)

(D) विद्वान मनुष्य

50. 'अ' व्यक्तिमत्त्व प्रकारातील एक घटक हृदय रोगाशी बहुतेक करून संबंधित असलेला दिसतो :

(A) विरोधीपणा

(B) आतुरता

(C) विचारशीलता

(D) बचावत्मकता

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



51. In an "If P then Q" clause the 'P' term is called :

(A) The antecedent

(B) The consequent

(C) A condition

(D) A connective

52. The semantic level of processing focuses attention on :

(A) the meaning of words

(B) the spelling of words

(C) the visual structure of written words

(D) the sound of spoken words

51. ''जर पी तेव्हा क्यू'' वाक्य 'पी' संकल्पनेस हे म्हणतात :

(A) पूर्ववर्ती

(B) परिणामात्मक

(C) सशर्त

(D) अनुबंधात्मक

52. संस्करणाच्या अर्थपर पातळीचे यावर लक्ष केंद्रित झालेले असते :

(A) शब्दांचे अर्थ

(B) शब्दातील मुळाक्षरे

(C) लिखित शब्दाची दृष्टिक्षम रचना

(D) बोललेल्या शब्दांची ध्वनी

www.prepp.in



53. The law of effect was initially formulated by :
   (A) B.F. Skinner
   (B) E.L. Thorndike
   (C) J.B. Watson
   (D) John Dewey

54. Signal detection theory is a :
   (A) no threshold theory
   (B) absolute threshold theory
   (C) differential threshold theory
   (D) point of subjective equality theory

55. The following is *not* a component of Biederman's recognition by components theory of perception of edges :
   (A) curvature
   (B) balance
   (C) symmetry
   (D) collinearity

53. परिणामाचा नियम सर्वप्रथम यांनी मांडला :
   (A) बी. एफ. स्किनर
   (B) ई. एल. थॉर्नडाईक
   (C) जे. बी. वॅटसन
   (D) जॉन ड्यूई

54. संकेत शोधन उपपत्ती ला हे म्हणतात :
   (A) सीमा विरहित उपपत्ती
   (B) निरपेक्ष सीमा उपपत्ती
   (C) भेदन सीमा उपपत्ती
   (D) व्यक्तिनिष्ठ समता बिंदू

55. बायडरमन ह्यांच्या ''रेकगनिशन बाय कॉम्पोनन्टस्'' ह्या उपपत्तीत कडांच्या संवेदना, हा घटक **नसतो** :
   (A) वक्रता
   (B) संतुलन
   (C) सममिती
   (D) सहरेखीयता

www.prepp.in



56. The following is *not* an impulse control disorder :

(A) Trichotillomania

(B) Kleptomania

(C) Enuresis

(D) Pyromania

57. Which of the following are process theories of motivation ?

(1) Vroom

(2) Maslow

(3) Herzberg

(4) Stacy

(A) (1) and (2)

(B) (2) and (3)

(C) (1) and (4)

(D) (3) and (4)

56. ह्यापैकी कोणती विकृती चेतावेग नियंत्रण विकृती **नाही** ?

(A) केशोच्छेदी उन्माद

(B) चौर्य उन्माद

(C) असंयत मूत्रविकृती

(D) दहनोन्माद

57. खालीलपैकी कोणते सिद्धांत प्रेरण प्रक्रिया सिद्धांत म्हणून ओळखले जातात ?

(1) व्रूम

(2) मॅसलो

(3) हर्झबर्ग

(4) स्टॅसी

(A) (1) आणि (2)

(B) (2) आणि (3)

(C) (1) आणि (4)

(D) (3) आणि (4)

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



58. The infant uses imperative gestures to get others to :

(A) notice the infants ideas

(B) expand pidgins into vocables

(C) fulfil the infant's requests

(D) initiative communication via telegraphic speech.

59. Who believed that children learn about their world through their interactions with others ?

(A) Vygotsky

(B) Piaget

(C) Seigler

(D) Gelman

58. इतरांचे लक्ष आपल्याकडे आकर्षित करून घेण्यासाठी अर्भक अत्यावश्यक हावभाव करतो :

(A) अर्भकाच्या कल्पनाकडे लक्ष जावे

(B) शब्दाद्वारे सोपीभाषा बोलतो

(C) अर्भकाच्या विनंत्या पूर्ण व्हाव्यात

(D) संदेशपर भाषेच्या माध्यमातून प्रारंभिक विनिमय

59. कोणाची अशी धारणा होती की, मुले ही इतरांशी झालेल्या आंतरक्रियातून आपले जग जाणून घेण्याचे शिकतात :

(A) वागोटस्की

(B) पियाजे

(C) सिगलर

(D) गेलमन

www.prepp.in



60. In the WADA technique, the following susbtance is injected to anesthesize one hemisphere temporarily

(A) Sodium chloride

(B) Sodium amytal

(C) Potassium amytal

(D) Potassium chloride

61. Sleep apnea is a disorder that involves :

(A) Respiration

(B) Circulation

(C) Digestion

(D) Seizure activity

60. वाडा तंत्रात, एका गोलार्धात हा पदार्थ टोचून तो तात्पुरता बधीर केला जातो :

(A) सोडियम क्लोराइड

(B) सोडियम आमिटाल

(C) पोटॅशियम आमिटाल

(D) पोटॅशियम क्लोराइड

61. निद्रा ॲप्निया ह्या विकृतीत ह्याची समस्या आढळते :

(A) श्वासोच्छ्वास

(B) रक्ताभिसरण

(C) पचन

(D) आपस्मारी

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



62. Which one is a method of factor analysis in which the variables are considered samples from a population of variables ?

(A) Centroid method

(B) Alpha factoring

(C) Exploratory factor analysis

(D) Confirmatory factor analysis

63. The correlation between two variables while controlling for a third or more other variables is known as :

(A) Zero-order correlation

(B) Part correlation

(C) Partial correlation

(D) Semi-partial correlation

62. घटक विश्लेषणाची कोणती पद्धत आहे की, ज्यामध्ये परिवर्त्ये हे परिवर्त्य समष्टीमधील एक नमुना म्हणून मानले जाते ?

(A) केंद्राभ पद्धती

(B) अल्फा घटक सारिणी

(C) शोधक घटक विश्लेषण

(D) पुष्टिदर्शक घटक विश्लेषण

63. तिसऱ्या किंवा जास्त परिवर्त्यावर नियंत्रण ठेवून दोन परिवर्त्यांमधील मिळविलेल्या सहसंबंधास असे म्हणतात :

(A) शून्यक्रम सहसंबंध

(B) भाग सहसंबंध

(C) आंशिक सहसंबंध

(D) अर्ध-आंशिक सहसंबंध

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



64. The relationship between intelligence test scores and academic achievement is :

(A) higher in college than primary grades

(B) equal in magnitude throghout the educational range

(C) higher in primary grades than college

(D) highest in those who go on to graduate school

65. Fight or flight response is the responsibility of which of the following system ?

(A) Somatic nervous system

(B) Central nervous system

(C) Sympathetic nervous system

(D) Hypothalemic-pituitary axis

64. बुद्धिमत्ता चाचणीतील प्राप्तांक आणि शैक्षणिक उपलब्धी यांच्यातील हे संबंध आहे :

(A) प्राथमिक दर्जापेक्षा महाविद्यालयीन दर्जा उच्च

(B) शैक्षणिक विस्ताराबाबत सतत समान आनाका

(C) महाविद्यालयापेक्षा प्राथमिक ग्रेडमध्ये उच्च

(D) जे ग्रॅज्युएट स्कूलला जातील त्यांच्यात उच्च

65. लढा अथवा पळकाढा अनुक्रिया ही खालीलपैकी कोणत्या रचनेची/प्रणालीची जबाबदारी आहे ?

(A) कायिक चेता संस्था

(B) मध्यवर्ती नससंस्था

(C) अनुकंपी चेता संस्था

(D) अधश्चेताक्षेपक-पीयूषिका अक्ष

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



66. A theory of creativity based on a multivariate approach was developed by :

(A) Siegler and Richards

(B) Solso and Raynis

(C) Sternberg and Lubart

(D) Hunt and Lansman

67. Animals were exposed to a series of learning tasks that required overlapping skills. Regardless of the sequence in which the tasks were presented, learning was considerably faster on the last problem in each animal's series than on the first. The study was most likely designed to investigate :

(A) Classical conditioning

(B) Observational learning

(C) Latent learning

(D) Learning set acquisition

66. बहुविध दृष्टिकोणाच्या आधारावर सृजनशीलतेचा सिद्धांत कोणी विकसित केला ?

(A) सिगलर आणि रिचर्डस

(B) सोल्सो आणि रेयानीस

(C) स्टर्नबर्ग आणि लुबार्ट

(D) हँट आणि लॅन्समन

67. प्राण्यांना एकामागून एक अध्ययन कार्ये ज्यात अनेक कौशल्याच्या अतिव्याप्तीची गरज होती. क्रमाचा विचार न करता अनेक कार्ये सादर करण्यात आली. पहिल्या अध्ययन समस्येपेक्षा शेवटच्या प्रयत्नात प्रत्येक प्राण्याचे एकामागून एक होणारे अध्ययन लक्षात येण्याजोगे वेगाने झाले. प्रस्तुत अभ्यासातून बहुतेक करून शोध घेण्यासाठी आखणी करण्यात आली होती :

(A) अभिजात अभिसंधान

(B) निरीक्षणात्मक अध्ययन

(C) सुप्त अध्ययन

(D) अध्ययन संपादन संच

www.prepp.in



68. Skinner demonstrated that organisms tend to repeat responses that are followed by favourable consequences. Skinner termed these favourable consequences :

(A) Unconditioned stimuli

(B) Reinforcement

(C) Rewards

(D) Bribes

69. Neurofibrillary tangles and plaques are detected in brain scans of patients with :

(A) Temporal Lobe Epilepsy

(B) Meningitis

(C) Hydrocephalus

(D) Alzheimer's disease

70. Hawthorne studies implied the significance of :

(A) Physical environment

(B) Psychological environment

(C) Human relations

(D) Leadership dynamism

68. स्किनरने प्रात्यक्षिकाद्वारे दाखवून दिले की, अनुकूल परिणामामुळे प्राण्यामध्ये तिच तिच अनुक्रिया देण्याचा कल दिसून येतो. स्किनरने या अनुकूल परिणामास नाव दिले :

(A) अनअभिसंधीत उद्दीपक

(B) प्रबलीकरण

(C) पारितोषिक

(D) लाच

69. चेताअक्षतंतूंचा गुंता व प्लाक ह्या आजारात मेंदूच्या स्कॅनमध्ये अढळतात :

(A) कुंभखंड अपस्मार

(B) मस्तिकावरण शोथ

(C) जलकपालता

(D) अल्झायमर रोग

70. हॉथोर्न अभ्यासमालिका ................ चे महत्व सूचित करते.

(A) भौतिक वातावरण

(B) मानसिक वातावरण

(C) मानवी सहसंबंध

(D) नेतृत्व गतिशीलता

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



71. Match List I with List II and select the *correct* answer using codes given below :

**List I**

(P) Phonology

(Q) Morphology

(R) Semantics

(S) Morphemes

**List II**

(1) The expressed meaning of words and sentences.

(2) The basic units of sound that are used in spoken language.

(3) Smallest meaningful language units.

(4) Rules governing the formation of meaningful words from sound.

**Codes :**

| | (P) | (Q) | (R) | (S) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (3) | (2) | (4) |
| (B) | (4) | (2) | (3) | (1) |
| (C) | (2) | (4) | (1) | (3) |
| (D) | (3) | (1) | (4) | (2) |

71. यादी I आणि यादी II यांच्या जोड्या लावा आणि खाली दिलेल्या सांकेतांकाच्या आधारे योग्य उत्तर निवडा :

**यादी I**

(P) फोनोलॉजी

(Q) मार्फोलॉजी

(R) शब्दार्थशास्त्र

(S) मार्फीमूस

**यादी II**

(1) वाक्ये आणि शब्दाची अर्थपूर्ण अभिव्यक्ती

(2) बोलण्याच्या भाषेत वापरले जाणारे आवाजाचे मूलभूत घटक.

(3) लहान अर्थपूर्ण भाषेचे घटक.

(4) आवाजापासून अर्थपूर्णशब्दांच्या निर्मितीचे नियमन करणारे नियम.

**सांकेताक :**

| | (P) | (Q) | (R) | (S) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (3) | (2) | (4) |
| (B) | (4) | (2) | (3) | (1) |
| (C) | (2) | (4) | (1) | (3) |
| (D) | (3) | (1) | (4) | (2) |

Prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



72. Which of the following is *not* a long-term outcome associated with childhood obesity ?

(A) Cognitive deficits

(B) Being overweight as adults

(C) Greater risk of heart disease

(D) Higher prevalence of diabetes

73. Research suggests that the component of type A behaviour pattern that is most likely to lead to heart disease is :

(A) time-consciousness

(B) hostility

(C) competitiveness

(D) a hard-driving attitude

74. In REM sleep, the EEG resembles :

(A) stage 4 sleep

(B) wakeful state

(C) delirium

(D) stage 2 sleep

75. Which one of the following correlations between two measures provides the most accurate basis for predicting one of the measures from the other ?

(A) – 0.88

(B) – 0.01

(C) + 0.05

(D) + 0.76

72. खालीलपैकी कोणता घटक हा बाल्यावस्थेतील लठ्ठपणाशी दीर्घकालीनतेचा परिपाक म्हणून संबंधित **नाही** :

(A) बोधात्मक कमतरता

(B) प्रौढ म्हणून वजन वाढते

(C) ऱ्हदय विकाराची अधिक जोखीम

(D) मधुमेहाचे वाढते प्राबल्य

73. संशोधन असे सूचविते की, टाईप-अ वर्तन संघाताचा एक घटक की जो हृदय विकाराचा धोका निर्माण करतो तो म्हणजे :

(A) वेळ-सबोध

(B) वैरभाव

(C) स्पर्धात्मकता

(D) कणखर-कामसू वृत्ती

74. आर. ई. एम्. निद्रेतील मस्तिष्क विद्युतलेखी अशा भासतात :

(A) 4 टप्प्याची निद्रा

(B) जागरूक स्थिती

(C) भ्रांती

(D) 2 टप्प्याची निद्रा

75. दोन मापनीमधील खालीलपैकी कोणता सहसंबंध गुणांक हा एका मापनीवरून दुसऱ्या मापनीचे पूर्वकथन करतांना सर्वात तंतोतंत आधार असेल ?

(A) – 0.88

(B) – 0.01

(C) + 0.05

(D) + 0.76

www.prepp.in



## ROUGH WORK

Your Personal Exam Guide